**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ६२ दिनांक २५/१०/२०२४**

# आगामी विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने पालघर पोलीस दलाकडून अवैधरित्या दारु, अग्निशस्त्रे व तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपींविरूध्द केलेली कारवाई

आगामी सार्वत्रीक विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्रात आदर्श आचारसहिता लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना पालघर जिल्हयात चालणारे अवैध धंदे, विनापरवाना अग्नीशस्त्र बाळगणारे इसम यांचेविरूध्द कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने पालघर जिल्हा पोलीसांकडून दिनांक १५/१०/२०२४ ते दिनांक २४/१०/२०२४ दरम्यान एकूण १०२ दारुबंदीच्या कारवाया करुन त्यात १०८ आरोपी अटक करुन एकूण ३६,५८,१३५/- रुपये किंमतीची ७१७९.२५ लीटर देशी/विदेशी/गावठी दारु जप्त करुन एकूण ३४,३२,७००/- रुपये किंमतीची १४ वाहने जप्त केलेली आहेत. तसेच विनापरवाना शस्त्र बाळगणारे इसम यांचेवर आर्म ॲक्ट प्रमाणे एकूण २ गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण ३ आरोपींना अटक करुन त्यांचेकडून ३ अग्निशस्त्रे जप्त केलेले आहेत. तसेच सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने अधिनियम २००३ चे कलम ७,२०(२)प्रमाणे एक गुन्हा दाखल करुन एकुण ४,८३,०००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन दोन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई मा. श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, मा. श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे पालघर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडून करण्यात आलेली आहे.